**महत्वाचे**

**U-DISE 2014-15**

**कालमर्यादित**

शिउसं/सशिअ/U-DISE/२०१४-१५/2 10235-8

शिक्षण उपसंचालक,मुंबई विभाग, मुंबई
यांचे कायार्लय, जवाहर बाल भवन,
नेताजी सुभाष मार्ग, चनीरोंड, मुंबई - ०४.
Email : dd.mumbai@mahedu.gov.in

दिनांक :- 10 OCT 2014

प्रति,

शिक्षण निरीक्षक,
दक्षिण/उत्तर/पश्चिम विभाग,
मुंबई.

**विषय :- U-DISE प्रणालीमार्फत सन २०१४-१५ या वर्षात जिल्हयातील सर्व शाळांची माहिती संकलित करून संगणकीकरण करण्याबाबत.**

**संदर्भ:-** मप्राशिप या कार्यालयाचे पत्र क्र.मप्राशिप/सशिअ/संगणक/U-DISE/२०१४-१५/३७२८,दि.०८.१०.२०१४

उपरोक्त संदर्भिय विषयानुसार आपल्या जिल्हयातील इयत्ता १ ली ते १२ वी पर्यंत सर्व अभ्यासक्रमाच्या शिक्षण देणाऱ्या सर्व शाळांची माहिती U-DISE प्रणाली मार्फत संकलित करून संगणकीकृत करण्याबाबतच्या सूचना देण्यात आल्या आहेत. या प्रणालीमार्फत संकलित होणाऱ्या माहितीचा उपयोग हा पुढील वर्षाचे सर्व शिक्षा अभियान, राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान व बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ तसेच इतर योजनांची अंमलबजावणी करण्याबाबत भारत सरकारने सुचित केले आहे.

U-DISE २०१४-१५ चे अंतीम प्रपत्र दिनांक ०८.१०.२०१४ रोजी आपल्या कार्यालयाला ई-मेलव्दारे पाठविण्यात आले आहे. **U-DISE प्रपत्र आपल्यास्तरावरून शाळांना दि.१०.१०.२०१४ ते दि.१४.१०.२०१४ पर्यंत वितरीत करून ते प्रपत्र शाळेच्या मुख्याध्यापकांमार्फत दि.१५.१०.२०१४ पर्यंत भरून घेणे आवश्यक आहे. संकलित झालेल्या प्रपत्राची तपासणी दि.१६.१०.२०१४ ते दि.२१.१०.२०१४ या कालावधीत १०० टक्के तपासणी सहा. शिक्षण उपनिरीक्षक यांचेमार्फत करण्यात यावीत. प्रपत्राची २० टक्के तपासणी शिक्षण उपनिरीक्षक यांनी करावी व शिक्षण निरीक्षक यांचेमार्फत २ टक्के तपासणी करण्यात यावी.**

**दि.२७.१०.२०१४ ते दि. ०७.११.२०१४ पर्यंत प्रपत्रातील माहितीचे संगणकीकरण सहा कम डाटा एन्ट्री ऑपरेटरमार्फत आपल्यास्तरावर करण्यात यावे.**

**प्रथम प्राधान्याने U-DISE २०१४-१५ चे काम पूर्ण करण्यात यावे.** सदर कामामध्ये कोणत्याही प्रकारचा विलंब झाल्यास याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहिल याची दक्षता घ्यावी.

(भि. दि. फडतरे)
शिक्षण उपसंचालक,
मुंबई विभाग, मुंबई.

**प्रत माहितीस्तव सविनय सादर,**

मा. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, जवाहर बालभवन, नेताजी सुभाष मार्ग, चर्नीरोड (प.) मुंबई ४०० ००४.